# ' शिरडी माझें पंढरपूर '

लेखक : डॉ. के. भ. गव्हाणकर

**शीलधी अर्थात् श्रीक्षेत्र शिरडी क्षेत्र वर्णन हें श्रीसाईभक्तांसाठी बाबांचे एक भक्त डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर यानीं १९५४ सालीं लिहिलेले छोटेखानी परंतु माहितीपूर्ण पुस्तक आहे. त्यानंतर ७।८ वर्षांच्या काळांत नानाविध सुधारणा घडून आल्या आहेत. बाबांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना ही त्यांपैकीं एक होय. त्यांत त्यानी समाधि मंदिराची पुढीलप्रमाणे ओळख करून दिली आहे—**

चैतन्याची ज्योत, आनंदाची प्रभा व सगुण साक्षात्काराचें जीवंत वैभव अनुभवण्याचें स्थान, आनंदजीवन भगवान् श्रीसाईबाबा याचे समाधि मंदिर होय. तेथें भगवत भक्ताचे हृदयात बसून विश्रांती घेतो. भक्ताच्या भजनाच्या वेणुनादानें कृपाळू साईमाउली भक्ताच्या हृदयमंदिरात प्रकाशून गोड गोड बोलू लागते. पंच पंच-उषःकालीं अंतःकरणाच्या निर्मल तेजोमय प्रकाशांत प्रभुत्वाची जागृती होते. प्रेमरसपान्हा चित्तात उदित झाल्यावर, चित्त चैतन्यस्वरूप होऊन, आनंदाच्या डोहीं आनंदतरंग सारखे येऊ लागतात, आणि दुःखद संसारापासून सहज निवृत्ति होते. बहिर्मुखता हाच संसार, तो जीवाला स्वाभाविक आनंदापासून म्हणजेच पूर्ण आत्मस्वरूपासून च्युत करीत असल्यामुळें दुःखावह होतो आणि मोक्ष म्हणजे स्वतःच्या स्वाभाविक अवस्थेचा अनुभव आपोआप मिळतो.

हें समाधि—मंदिर एका काळ्या दगडाची भव्य इमारत आहे. तेथें संगमरवरी प्रस्तराच्छादित बाबांच्या पतितपावन समाधीचें दर्शन, व त्यावर असणाऱ्या चांदीच्या कमळांतील पादुकावर डोकें ठेवणें म्हणजे कृतार्थ झाल्याची पावतीच. भक्ति हा प्रभूचा सहज प्रकाश आहे. त्या प्रकाशाची प्रतीति समाधि—मंदिरांत गेल्यावर येते. प्रेमाच्या कल्लोळात प्रेमप्रकाशाच्या भोक्तृत्वानें जी स्थिती निर्माण होते, तीच भक्ति होय. अर्थात् आनंद हा आत्मा असून चित्त शांत होतांच तो स्पष्टपणें अनुभवास येतो.

समाधी नक्षीदार संगमरवरी दगडाच्या कठड्यानें चांदीच्या वेष्टणासह सुशोभित केलेली आहे. त्यावर चांदीच्या चौरंगावर विराजमान झालेली ती श्रीसाईंची प्रेमळ मूर्ति ( छबी ); शिरावर चांदीची दिव्य प्रभावळ झळकत असणारी, नयनमनोहर

सजीव सगुण मूर्ति; जणूं काय भक्तांची सहृदयतेनें वाट पहात तिष्ठत बसली आहे. चौरंगाच्या दोन्ही बाजूंनीं प्रभूच्या मुखकमलावर मंद मंद प्रकाश पाडणाऱ्या समया ( नंदादीप ) समाधीला विशेष शोभा देत आहेत.

मंदिरामागें "बाबांची विहीर" म्हणजे भक्तांकरितां बाबांनीं श्रीगंगेलाच आपल्या चरणांतून प्रगट केली आहे, असेंच वाटतें.

मंदिरासमोर संस्थान कमिटीने हल्लीं १९५२ सालांत मंदिराला लागून अजमासें ४०० ते ५०० भक्त बसतील असा सुंदर सुव्यवस्थित भव्य सभामंडप व दर्शनीं नंदीची बैठक करून घेतली असल्यामुळें दुधात साखरच पडली आहे.

नंदीच्या पाठीमागें उघड्या जागेंत कार्यक्रमाकरिता मध्यभागी एक स्टेज व भक्तांना उतरण्याकरितां दुतर्फा चाळी, मांगल्यातील मंगलपणाची झांक स्पष्ट दाखवीत आहेत. संस्थान कमिटीनें भक्तांच्या सोयी–गैरसोयींच्या विचाराकरितां मंदिरात शिरतांना दर्शनीं ऑफीस थाटलें आहे.

बाबाचे निस्सीम भक्त श्रीमंत बापूसाहेब बुट्टी यांना सुमारें १९१६ ते १९१८ मध्यें श्रीमुरलीधराचें देवालय बांधण्याचा दृष्टांत शिरडींतच झाला. तसाच दृष्टांत कै. माधवराव देशपांडे व कै. हरी सीताराम दीक्षित ऊर्फ काका यांना झाला. त्याप्रमाणें श्रीबाबाची परवानगी घेऊन त्या इमारतीचें काम श्रीसाईबाबाच्या खास देखरेखीखालीं करण्यांत आलें. हाच तो बुट्टीचा वाडा, अर्थात् समाधिमंदिर.

हें मंदिर दुमजली असून तिसऱ्या मजल्यावर चुन्याची गच्ची केलेली आहे. इमारतींत खालीं व वर पुष्कळ खोल्या असून खालीं ( सभामंडपाचा समावेश ) व वर प्रशस्त असे दिवाणखाने आहेत.

मागच्या बाजूस जी विहीर आहे तिला फरशी, मोकळ, व्हाट व समाधीस स्नान घालण्याकरिता पाणी तापविण्याची जागा व स्नानाकरिता न्हाणीगृह केलेलें आहे. समाधिमंदिरात बाबाच्या भक्तांच्या छबी लावल्या आहेत.

१९५२ सालीं विजयादशमी ता. २८ सेप्टेंबर रोजी दु. १२ वा. समाधिमंदिरावर सोन्याचा कळस बसविण्याचें कार्य विद्वद्रत्न श्री. पारनेरकर महाराज यांचे हस्तें यथायोग्य विधिपूर्वक पूर्ण झालें. त्यावेळचा सोहळा अपूर्व होता. हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यापासून असंख्य भक्तगण हा सुखसोहळा अनुभवण्याकरिता जमा झाला होता.

एकदां बाबा लेंडीवर जात होतें, मंदिर पुरें झालें होते व मुहूर्त करणें होता. माधवराव देशपांडे बाबांना म्हणाले, "देवा, देऊळ बघायला चला." बाबा आंत

गेले व त्या जागेवर तेवढीच जागा आंखून म्हणाले, " आतां आपण इथेंच रहायला बेऊं, येथेंच खेळू, समद्या पोरासनं येथेंच बोलावू बरं का श्याम्या ! ! " इतकें बोलल्या-वर ही संधि बरी आहे असें समजून शामा म्हणाला, " मग देवा, मुहूर्त करायला ही वेळ बरी आहेना ? आणूं का नारळ ? " बाबांनीं नारळ फोडून मुहूर्त केला आणि राधाकृष्णाच्या मूर्तीऐवजीं आपणच राधाकृष्ण होऊन राहिले.

" माझी समाधि बोलेल, माझीं हाडं तुर्बतींतून बोलतील बरं का शामा ! " बाबांची ती वाणी आज भाविक भक्ताच्या अनुभवाला येत आहे.

तेराव्या शतकांत श्रीज्ञानेश्वर महाराजाची भिंत चालली, १८ व्या शतकात श्रीबाजीबुवाची समाधी डोलली, व २० व्या शतकात श्रीसद्‌गुरु साईबाबाची समाधी बोलली.

पुणें व सातारा याचे दरम्यान ३२ मैलावर भोर संस्थानांत शिरवळ म्हणून एक गांव आहे. या शिरोवलय ( शिरवळ ) ग्रामीं ३००/४०० वर्षांपूर्वी ब्राह्मण जातीचे श्रीनारायणस्वामी म्हणून एक प्रसिद्ध अधिकारी पुरुष होऊन गेले. त्यांची समाधी शिरवळ येथें श्रीराममंदिराच्या आवारात आहे. त्याचे सच्छिष्य श्री बाजीबोवा म्हणून क्षत्रिय जातीचे अधिकारी सिद्धपुरुष होऊन गेले. त्यांची समाधि श्रीनारायण-स्वामींच्या समाधीनजीक थोड्याच अंतरावर त्याच मंदिराच्या आवारात आहे.

या बाजीबोवांचा असा लौकिक होता कीं, ती समाधी " बाजी, डोल " असें म्हणून तिची शुद्ध अंतःकरणाने प्रार्थना केली तर ती डोलत असे. ही वार्ता श्रीमंत थोरले माधवराव साहेब पेशवे याच्या कानावर गेली. तो लौकिक ऐकून माधवराव साहेब शिरवळास आले, व त्यानी " बाजी, डोल " अशी मनःपूर्वक भक्तिभावानें व श्रद्धेनें समाधीची प्रार्थना केली, त्याबरोबर समाधी खरोखरच डोलू लागली.

प्रभूचें जीवावर अनिवार प्रेम, ते प्रेम जो प्रतीतींत घेतो, त्या सुखानें, बोधानें वावरतो त्या सर्व क्रिया भक्तीच्याच होत. भक्ति म्हणजे प्रीति–अनुभव, ही प्रीति जीव कोठून बाहेरून आणू शकणार नाहीं. देवाला शरण जाणें असलें, तर हें प्रेम प्रभूशीं एकरूप असलेलें जाणण्यानेंच असू शकेल. " पैं आपुलेनि भेदेंवीण । माझें जाणिजे एकपण । तयाचि नाव शरण । मज येणें गा ।। ( ज्ञाने. ) प्रत्येक वस्तु " सत्–आहे," या एका रुपानें प्रत्ययास येत असल्यामुळें ती आत्मरूपानें व्याप्त आहे. आत्म्यावाचून मी काहीं पहात नाहीं. प्रत्येक वस्तूबरोबर मला आत्म्याचा प्रत्यय येत आहे, इत्यादि भावना दृढ झाल्यावर ' सर्वं ब्रह्ममयं जगत् ' असें वाटणें मुळींच अशक्य नाहीं. अंतर्दृष्टीचा अभाव हीच काय ती कठिणता आहे. प्रेमसुखाच्या गोडीनें त्या

सुखांत विरण्याची अवस्था ती भक्ति होय. अशा त्या जीवींच्या जिव्हाळयानें केलेल्या प्रार्थनेनें निर्जीव मानली गेलेली श्रीसतसमाधी चर्मचक्षूंना प्रत्यक्ष डोललेली दिसली, हें पाहून माधवरावांना प्रेमानंद झाला, व त्यावेळी समाधीच्या नित्यनैमित्तिक व पूजेअर्चेच्या खर्चाकरिता जमीन इनाम करून देऊन सनद करून दिली.

"सनदेंत आपण स्वतः 'बाजी, डोल' अशी समाधीची प्रार्थना केल्यावर समाधी डोलली म्हणून समाधीच्या खर्चाकरितां हें इनाम करून दिलें आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.

१३ व्या शतकांत १४०० शें वर्षांच्या योगसाधनाच्या बळावर चांगदेव महाराज समाधियोगाचें सामर्थ्य दाखविण्याकरिता भयंकर रानटी वाघावर बसून व विषारी सर्पांचा चाबूक हातात घेऊन श्रीभगवान् ज्ञानेश्वर महाराज यांच्या भेटीकरितां आळंदीस आले. त्यावेळेस श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं चांगदेवाचा हेतु जाणून ज्या निर्जीव पडक्या भिंतीवर ही भावंडे बसलेलीं होतीं त्या भिंतीस चालण्याची आज्ञा केली व ते चांगदेवाला त्याचे स्वागतासाठीं सामोरे गेले.

निर्जीव अशा पडक्या भिंतीवर बसून श्रीज्ञानेश्वर महाराज आपणांस सामोरे आले हें पाहून सजीव व्याघ्रसर्पादि क्रूर प्राण्यावर सत्ता संपादन करण्यापेक्षां आपण १४०० शे वर्षे योगयाग करून जास्त काही कमाई केली नाही म्हणून चांगदेव खिन्न झाले व निर्जीव भिंतीवर सत्ता चालविणाऱ्या श्रीज्ञानेश्वर महाराजांना शरण गेले.

तद्वत् "माझी तुर्बत बोलेल," त्याप्रमाणें ती डोलली हें खालील अनुभवावरून स्पष्ट होतें.

कै. बाबासाहेब तर्खडकर हे प्रसिद्ध विद्वन्मणि मातृभाषाव्याकरणकार श्री. दादोबा पांडुरंग यांचे जवळचे नातेवाईक असून स्वतः बी. एस्. सी. पदवीधर होते. त्यांना बाबांची भेट १९१० सालीं झाली. तत्पूर्वी ते पूर्ण प्रार्थनासमाजभक्त होते. पण श्रीबाबांचें दर्शन झाल्यापासून ते पक्के मूर्तिपूजक बनले. "बाबांची समाधी बोलली" हा त्याचाच अनुभव देत आहे.

शके १८५४ च्या श्रीरामनवमी-उत्सवाकरिता १९३२ सालीं बाबासाहेब तर्खडकर शिरडीस गेले होते. नित्यनेमाप्रमाणें स्नानानंतर श्रीसाईबाबांच्या अत्यंत पवित्र अशा श्रीद्वारकामाईत जाऊन श्रींच्या तसबिरीपुढे लोटांगण घालून, कापूर-उदबत्ती लावून श्रींच्या तसबिरीला प्रेमपूर्वक न्याहाळून, नंतर तेथल्या पेटीत काहीं दक्षिणा ठेवून त्यांनीं पुन्हा एक साष्टांग नमस्कार घातला. श्रीधुनीमाईतील उदी कपाळाला लावली व प्रेमाने श्रींचा निरोप घेऊन श्रींच्या समाधिमंदिरात आले.

श्रीरामनवमीचा उत्सवसोहळा संपला व परत मुबईस जाण्याकरितां १६ बैठकींची बस आदले दिवशीं ठरविण्यात आली व त्यासाठीं एक रुपया बयाणा आगाऊ देण्यांत आला. मुंबई, वांद्रे, पार्ले, अंधेरी वगैरे ठिकाणच्या गृहस्थांच्या १४ बैठकींची गोठवण झाली होती, व बस ११ वाजता कोपरगांवाहून येणार होती. अशी सर्व तयारी झाल्यामुळें त्यांचे मन निर्धास्त होतें.

नित्याप्रमाणें श्रीद्वारकामाईत श्रींच्या दर्शनासाठीं ते गेले तेथें बसल्यावर श्रींच्या मुखकमलाकडे नजर जाताच त्यांची ( बाबाची ) ती उग्र झालेली मुद्रा पाहून त्यांच्या मनाला चटका बसला. ते जड पावलानीं रस्त्याकडे आले.

सकाळचा ११ चा सुमार होता. मोटार आली भरभर २० माणसें चढून आंत बसली; मोटार १६ बैठकीची आणि २० माणसाची भरती! मोटारवाला मोटर चालवीना. इंदूरचे एक गृहस्थ होते ते उतरून मागाहून एक बस आली त्यात बसून गेले. त्या बसनें जाण्यास सवड होती, परतु कोणीही उतरेना. ती बस निघून गेली. ११॥ वाजले. तेव्हा बाबासाहेब बसमधून उतरले, सामान उतरून घेतलें व तें घेऊन दीक्षित वाड्यात जड पावलानीं परत आले. दीक्षित वाड्यांत आल्यावर आज असें कां होतें? काय चुकतें? मनाला ही अस्वस्थता का? असा विचार करीत स्वस्थ पडले.

ती रात्र त्यानीं तळमळून काढली. दुसरा दिवस म्हणजे सोमवार ता. १८ एप्रिल हा होता. ता दिवस काल्याचा होता. नित्याप्रमाणे श्रीद्वारकामाईत गेले. श्रींचे दर्शन घेतले व समाधिमंदिरात नित्य कार्यक्रम करून पेटींत नित्याप्रमाणें रक्कम टाकून साष्टांग लोटांगण घातलें. नंतर श्रींच्या समाधीवरील पादुकावर मस्तक टेवलें. पादुकावर मस्तक टेवताक्षणीच "**अरे माझा सव्वा रुपया**" अशी स्मृति झाली व कानाना स्पष्ट शब्द ऐकू आले.

बाबासाहेबाना अत्यानंद झाला व सद्गदित अंतःकरणानें खिशातून सव्वा रुपया काढून त्यानी तो समधीच्या पेटींत टाकला. सर्व खिन्नता क्षणार्धांत पार नाहींशी झाली. तसेच श्रीद्वारकामाईत धावत गेले. तो श्रींची चर्या अत्यंत आनंदात दिसली. सर्व गोष्टीचा उलगडा झाला.

## हा सव्वा रुपया काय व कसला?

शिरडीस जाण्यासाठीं मुंबईहून निघतेवेळीं, सूनबाईनें सव्वा रुपया पुढे ठेवला आणि म्हणाली कीं, "हे पैसे श्रींच्या समाधीच्या पेटींत टाका." तेव्हां झालेला संवाद:—

"पेटींत कशाला टाकावयाचा? तो श्री. दासगणूकडे जाईल!"—

" आईना का ! "

" मग उत्सवाची पावती ( फंड ) घेतली तर श्रीरामनवमीच्या अहवालांत तुझें नाव येईल."

" मला नांव प्रसिद्ध होण्याशीं काय करावयाचें आहे ? पैसे श्रीसाईबाबाच्या चरणी अर्पण व्हावे हीच इच्छा."

ते पैसे बाबासाहेब पेटीत टाकण्यास विसरले. त्याच्या मनाची चलबिचलता वाढवून, त्याच्या विसराळूपणाविषयीं क्रोध व खेदयुक्त मुद्रेनें रविवारी निघण्यापूर्वी त्यांच्याकडे श्रीसाईमाउलीने श्रीद्वारकामाईंत पाहिले; आणि तितक्यानेंही जेव्हा त्याना आठवण होईना, तेव्हा त्याना जसें बसमधून खेंचून परत आणलें व ठेवून घेतलें. त्या रात्री देखील त्याना आठवण होईना, तेव्हां त्याच्या मानसिक तळमळीची दया येऊन श्रीसाईमाउलीनें आपल्या समाधीच्या पादुकांपाशीं

**" अरे माझा सव्वा रुपया "**

अशी स्मृति दिली.

या स्मृतीमध्यें माझा या शब्दाचें महत्त्व आहे. समाधीवरील श्रीच्या पादुकांवर मस्तक ठेवताच, तेथेंच का ही स्मृति जाग्रत व्हावी व ऐकू यावी ? इतर ठिकाणीं का येऊ नये ? **" माझा सव्वा रुपया "** ही स्मृति काय दर्शविते ? हें साईबाबांचे शब्द नव्हेत काय ? " बाबांचा सव्वा रुपया " अशी स्मृति का झाली नाही ? म्हणजे बाबा हे समाधिद्वारें बोलले नाहींत काय ? श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**देखिलेनि पदार्थें । जें आठवूनि दे मातें ।**
**ते स्मृतीही एथें । विशुद्धी मी ॥ २७९ ॥**

ज्या पदार्थदर्शनानें परमात्म्याची स्मृति होते, ती स्मृति माझी विभूति आहे असे समज, असे भगवतानी अर्जुनास सांगितले.

" सवा–रुपा–या–या रुपासाठी समाधीची वाट काढीत या " समाधिमंदिरांतील श्रींच्या समाधीवरील श्रींच्या पादुकांवर मस्तक ठेवतांच म्हणजे 'श्री'चरणदर्शन झाल्याबरोबर श्रीचा सवा रुपाया म्हणजे श्रींची स्मृति झाली व ती स्पष्ट ऐकूं आली अतएव ही स्मृति बाबांची विभूति आहे. व ही स्मृति समाधिद्वारा मिळाली म्हणजे समाधी बोलली असेच नव्हे काय ?

सुधारणेच्या शिखरावर पोहचलेल्या काळांत सुधारलेल्या शास्त्रीय ज्ञानाच्या दुर्बिणीनें पहाणाऱ्या विद्वान मंडळीस जर ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवास येते, तर यावरून श्रीसाई परमात्मा सजीव निर्जीव सृष्टींत अंतर्बाह्य कसे व्यात आहेत व त्यांचा अधिकार किती मोठा आहे याची साक्ष चांगलीच पटते.

"ईशावास्यादमिद सर्व यत्किंच जगत्यां जगत्" या ईशावास्योपनिषदुक्तीप्रमाणें श्रीसाईनारायणाचें निवासस्थान विश्वांतील प्रत्येक लहान मोठ्या सजीव व निर्जीव वस्तूत आहे, हें बाबासाहेबांचा वरील अनुभव सिद्ध करून देत आहे. तो अनुभव पुन्हा एकवार वाचून पहावा, म्हणजे यातील महत्व, सत्यत्व व रहस्य नीट लक्षांत येईल. बाबासाहेब अधश्रद्धाळू नाहींत. थोरले माधवराव याचा वरील पुरावा अंधश्रद्धेचा नाही. बाबासाहेबांचा व थोरले माधवरावांचा पुरावा प्रत्यक्ष प्रमाणच आहे. तरी सताच्या शब्दावर पूर्ण भरवसा ठेवून त्याप्रमाणें वागल्यास त्यात आपले परम कल्याण आहे. अर्थात् हल्लीच्या विसाव्या शतकांत विसाव्याची जागा म्हणजे शिरडीतील चालती बोलती श्रीसाईसमाधी–सगुणरूप विठ्ठल "शिरडी माझे पढरपूर" क्षेत्राला महत्व चढवीत आहे.

**शिरडी माझें पंढरपूर । साईबाबा रमावर ॥ १ ॥**
**शुद्ध–भक्ति चंद्रभागा । भाव पुंडलीक जागा ॥ २ ॥**
**या हो या हो अवघे जन । करा बाबांसी वंदन ॥ ३ ॥**
**गणू म्हणे बाबा साई । धांव पाव माझे आई ॥ ४ ॥**



⁕ उत्कृष्ट कागद ⁕ आकर्षक रचना
⁕ स्वच्छ व सुबक छपाई

**बॉम्बे सेंट्रल प्रेस**

मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं
जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकुरद्वार मुंबई २

# नामदेव वचनावली

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए

: १ :

## गाइ ले गोविन्द गुना

प्रभु गोविंदाचे गुण गात रहा. रामराया शिवाय राहाल तर दुःखी व्हाल. हीसंधि पुन्हा हातीं येणार नाही. म्हणुन, हे माझ्या मना ! तुला मी हें सांगत आहे.

जे जे ईश्वराला शरण गेले ते अधम असूनहि भजन-सामर्थ्यानें तरून गेले. तुम्हाला हें पटत नसेल तर मी अजामिळ, गणिका, सघना या भक्तांची साक्ष देतो.

ओंजळीतील पाणी क्षणाक्षणाला कमी होत जाते त्याप्रमाणे संपत्ति व तारुण्य घटत जाते, आणि हें लक्षांत ठेवून जगाला जीवन देणाऱ्या ईश्वराचें स्मरण करा. नामदेव म्हणतात, मी हरिचरणाची सेवा करतो.

: २ :

## धूप दीप आरती तुम्हारी

हे मुरारी ! तुम्हाला धूप व दीपारती करण्याकरितां कोणती सामग्री घेऊन मी सेवा करूं ?

अठरा भार वनस्पति ही तुमची केशपंक्ति आहे. तर मग तुम्हाला वाहण्याकरितां फुलें कोठून आणू ? तुमचें निवासस्थान सर्व क्षीरसागर आहे. मग मी नैवेद्याकरिता दूध कोठून आणू ? तुमची अनेक कोटी वाद्यें वाजत आहेत मग मी कोणती झांज घेऊन झुणझुण् आवाज काढू ? सर्व शरीरामध्यें अंतर्यामित्वानें तुम्हीच भोग घेत आहात तर मग कोणते साहित्य घेऊन तुम्हांला भोग चढवूं ?

संतांच्या सहवासांत राहून नामदेव ईश्वराचें गुणगान करीत क्षणाक्षणाला त्यास अभिवादन करीत आहे.

नामदेवांचे हें पद्य वाचतांना श्रीवल्लभाचार्यांच्या पुढील श्लोकाची आठवण होते:—

किमासनं ते गरुडासनाय
किं भूषणं कौस्तुभ भूषणाय ।
लक्ष्मी कलत्राय किमस्ति देयं
वागीश ! किं ते वचनीयमस्ति ॥

# श्रीरामकृष्ण आणि देवी शारदामणी

**श्रीरामकृष्ण परमहंस यांचा देवी शारदामणीशी यदृच्छेने विवाह झाला; परंतु आपण ज्याला संसार म्हणतो व त्या मायाजाळांत गुरफटून जातो, तशा प्रकारचा त्यांचा संबंध नव्हता. तो फार आगळा व दैवी स्वरुपाचा होता. साईलीलेच्या वाचकांस त्याची कल्पना या पूर्वीच्या १-२ लेखांवरून झालेली असेलच. या लेखांत त्यांच्या त्या दैवी संसाराचा आरंभ कसा झाला, याचा परिचय करून देण्यांत येत आहे.**

पूर्वाश्रमांत रामकृष्णाचें नाव गदाधर असे होतें. घरसंसारांत गदाधराचें लक्ष लागेना व तो प्रत्येक बाबतींत पूर्ण उदासीनतेनें वागूं लागल्यामुळें त्याच्या प्रेमळ आईने व वडील भावानें, योग्य वधू पाहून त्याचें लग्न करावें असे ठरविलें; तरी पण हा आपला विचार गदाधराला उर्फ गदाईला समजला तर तो अविवाहित राहण्याचा भलताच हट्ट धरून बसेल असें वाटल्यावरून त्याच्या आईनें व भावानें आपल्या मनांतील हा विचार त्याला कळू न देतां सिद्धीला नेण्याची तजवीज आरंभिली, पण चाणाक्ष गदाधराला आपल्या आईचें हें खलबत कळल्या-वाचून राहिले नाहीं आणि कळलें तरी त्यानें काहीं अडथळाही आणला नाही. इतकेंच नव्हे तर घरांत एकादा समारंभ व्हायचा असला म्हणजे मुलें ज्याप्रमाणें एक प्रकारच्या आनदांत गढून गेलेली दिसतात, त्याप्रमाणें या वेळीं गदाईची वर्तणूक होती. असो.

**आपणच स्थळ सुचविलें**

गदाईच्या आईने आसपासच्या गांवी लोकांना पाठवून मुली पहाण्याचा सपाटा चालविला; पण मनासारखी मुलगी कोठेंच आढळेना. तेव्हा गदाधरानें आपण होऊनच आईला सुचविलें की, बाकुरा जिल्ह्यातील जयरामवाडी नांवाच्या गावी श्रीरामचद्र मुखोपाध्याय याची मुलगी आहे ती पहा. लागलीच आईनें व भावानें त्या गावी आपली माणसे पाठविली व तपास केला तो गदाधराचें सागणें खरें असल्याचें कळून आलें. पुढे थोड्याच दिवसात उभय पक्षाची बोलणीचालणीं होऊन लग्नाचे ठरले व मुहूर्तनिश्चय होऊन इतराप्रमाणें विवाह समारभ थाटात पार पडला. रामकृष्णानीं कोणत्याही प्रकारें आढेवेढे न घेतां सर्वांच्या समाधानासाठीं विधि यथासांग करून

नेढले. घरात दागदागिने कुठून असणार? परंतु तात्पुरत्या शोभेसाठी कुणाचे तरी दागिने मागून आणून लग्नदिवस साजरा करण्यात आला.

शहरांत आणि कामारपुकूरसारख्या खेड्यात वाढलेल्या मुली यांत मानसिक आणि शारीरिक फरक असणें अपरिहार्य नाहीं. अंगसौष्ठव आणि त्याबरोबरच वाढणारा मनाचा सुसंस्कृतपणा हे गुण शहरांतील मुलींपेक्षां खेड्यांतील मुलीबाळींत उशीरा येतात. अल्पवयात थोरपणा येऊन तारुण्यात वृद्धावस्थेचा भास होणें हे प्रकार मुंबई, कलकत्तासारख्या शहरांत विशेष आढळतात. कारण खेड्यांपाड्यांतील मोकळ्या व शुद्ध हवेचा तेथे राहणाऱ्या मुलावर साहजिकच परिणाम होतो. साधी राहणी, श्रद्धाळू मन, जोरकस शरीर आणि रूढींनी बनविलेले संस्कार हे प्रकार खेडवळ मुलामुलींत जास्त आढळतात; वधू लहानच असल्यामुळें सासूला म्हणजे चन्द्रमणीला तिचा चांगलाच लळा लागला होता व लग्नाच्या दिवसापासूनच तिनें आपल्या या सुनेला मुलीप्रमाणें वागवायला सुरवात केली होती. पुढें आपल्या दागिने काढून घेण्याची वेळ आली तेव्हां त्या पोरीच्या अंगावरचे दागिने आता आपण काढून घेणार असें मनांत येतांच म्हातारीचे डोळे पाण्यानें भरून आले व तोंडून शब्द उमटेना. ही मनची गोष्ट बोलणार तरी कुणाकडे? पण गदाधर तसा चाणाक्ष. त्यानें आपल्या आईवरचा तो प्रसंग जाणला व तिचें शांतवन करून त्यानें आपली बायको झोपली असतां हलक्या हातानें तिच्या अंगावरचे दागिने काढून आईच्या स्वाधीन केले. अल्पवयी तेव्हां पोर. गाढ झोप असणारच. अर्थात आपल्या अंगावरचे दागिने घेण्यात आले हें तिला उजाडेपर्यंत कळले नाहीं. पण जागी होतांच त्या बुद्धिमान् पोरीनें हळूच आईला—सासूला—विचारलें, "माझ्या अंगावरचे सगळे दागिने काय झाले?" आता मात्र हा त्या एवढ्याशा पोरीचा प्रश्न ऐकतांच चन्द्रादेवीला रडूं कोसळलें आणि तिने तिला आपल्या मांडीवर घेऊन तिच्या तोंडावरून हात फिरवीत सद्‌गदित स्वरानें म्हटलें, "बाळे, या सगळ्या दागिन्यापेक्षांही उत्तम दागिने गदाधर तुला देणार आहे बरें का; रडूं नको."

## दागिन्यांची रडकथा

पण ही दागिन्यांची रडकथा इथंच संपली नाहीं. कर्मधर्म-संयोगानें त्याच दिवशीं वधूचा चुलता तिला पहाण्यासाठीं आला व हा प्रकार पाहून बराच रागावला. इतकेंच नव्हे तर तो तिला घेऊनही गेला. चंद्रादेवीला मात्र या एकंदर प्रकाराबद्दल फारच दुःख झालें. गदाधरानें तें पाहिलें तेव्हां तो तिला बरें वाटावें म्हणून विनोदी स्वरानें म्हणाला, "आई, ते कांही बोलोत आणि कांहीं करोत; पण माझा झालेला विवाह कांही त्यांना मोडतां येत नाहीं. विवाह झाला तो झालाच."

यानंतर शारदामणीला सातवें वर्ष लागल्यावर कुळधर्माप्रमाणें नवऱ्याबरोबर माहेरापासून दोन कोसावर असलेल्या कामारपुकूरगावी म्हणजे सासरी यावें लागलें.

रामकृष्णाचा कामारपुकूरात सतत असा काळ गेला तो इतकाच. त्यानंतर त्याना आपल्या या गावी फार दिवस राहतां आलें नाही. ज्या भैरवी ब्राह्मणीनें त्यांना परमार्थसाधनाचा मार्ग दाखविला व सर्वतंत्रविशारद केले, त्या बाईबरोबर आपला भाचा हृदय याच्यासह ते पुन्हा एकदा कामारपुकूरला आले. पुष्कळ वर्षांनी ते घरी आल्यानुळें घरच्या मंडळीला फार आनंद वाटला व अठराविश्वे दारिद्र्यांतही सुखाचें साम्राज्य थाटलें गेलें. इतकेंच नव्हे तर चाललेल्या आनंदोत्सवात कमतरता राहूं नये म्हणून बायकामंडळींनीं सुनबाईला आणण्यासाठी जयरामवाडीला माणसेंही पाठविली. विवाहानंतर शारदामणीने वयाच्या सातव्या वर्षी एकदाच काय ते आपल्या नवऱ्याला पाहिलें होतें आणि त्या वेळीं लाजेमुळें कुठें तरी घराच्या कोपऱ्यात ती उभी असे. हृदय मात्र आपल्या या छोट्या मामीला एकटी राहू देत नसे. तो तिला शोधून काढून निरनिराळ्या प्रकारच्या फुलांनी तिची ‘ पायपूजा ’ करी आणि त्यामुळे तर ती फारच लपून राही. ही झाली सातव्या वर्षाची स्थिति. त्यानतर तेराव्या वर्षी ती सासरी आली होती व एक महिना तिला राहावेंही लागलें होतें; पण रामकृष्ण त्या वेळीं दक्षिणेश्वरीं असल्यामुळें ती त्यांना पाहूं शकली नाहीं. अर्थात् लहान वयातील पतिदर्शनाच्या या दोन्ही वेळा अशा रीतीनें गेल्यामुळें अजूनपर्यंत तिला पुरतेसे पतीकडे पहाताही आले नव्हतें. आणखीही एकदां अशीच ती सासरीं आली होती; पण पतिदर्शन झालें नाहीं. शेवटीं या खेपेला जेव्हा तिला माणसें न्यायला आली व नवरा घरीं आला असल्याचें तिला समजलें तेव्हा तेरावें वर्ष संपून सहासात महिने झाले होते. अर्थात् या वेळीं तिला एक प्रकारची उत्सुकता वाटणे साहजिक होतें.

## रामकृष्णांची दिव्य संगत

असो. पवित्र बालिका शारदामणी देवी ही रामकृष्णाच्या दिव्य संगतीने व निस्वार्थी लाडकेपणानें इतकी कांहीं आनंदित झाली की तिला हेंच आपलें माहेर असें वाटू लागलें. फार काय, नवऱ्याचा बागुलबुवाही तिला वाटेनासा झाला. ती आपल्या पुढील आयुष्यात परमहंसांच्या स्त्रीभक्तांबरोबर बोलताना ओघानें आलेल्या बाळपणाच्या गोष्टी सांगत असे. अशाच एका प्रसंगीं ती एकदा आनंदानें म्हणाली, ‘ हृदयांत आनंदाचा भरलेला कलशच स्थापन केला आहे की काय असे मला त्या वेळीं जे वाटू लागलें तें कायमचेंच झालें, माझ्या त्या औत्सुक्यपूर्ण आनंदाला केव्हांच ओहोटी लागली नाही आणि त्यामुळेंच त्या प्रसंगाचें खरेंखुरें चित्र मला शब्दांनीं सांगतां येत नाहीं. ’

पुढे कित्येक दिवसांनी रामकृष्ण परमहंस हे कामारपुकुरहून कलकत्याला आले तेव्हां 'आपणाला खराखुरा आनंदाचा ठेवा सांपडला' या सत्य भावनेनेच शारदा मणीही आपल्या माहेरी गेली. यानंतर तिच्या चंचल आणि उच्छृंखल अशा बालस्वभावाला आळा बसला. ती विचारमग्न आणि शांत अशी दिसू लागली. **रामकृष्णासारख्या परिसाच्या स्पर्शाने तिचे मूळचें स्वरूप पालटत चाललें** यात आश्चर्य कसचे? त्यांनी तिला निस्वार्थी प्रेमाची दिव्यदृष्टी दिली होती आणि म्हणून **वसुधैव कुटुम्बकम्** अशी तिची वृत्ति बनत चालली. तिला कसलाही अभाव वाटेनासा झाला. प्राणिमात्राच्या दुःखाने ती दुःखी होऊ लागली आणि त्यामुळें प्रत्येकाबद्दल तिच्या हृदयात करुणा उत्पन्न होत चालली. तिला कितीही शारीरिक कष्ट पडले तरी कांही वाटेनासे झाले आणि आप्त-इष्टाकडून मानमान्यता मिळावी अशी तिची वृत्तिही राहिली नाहीं. ती नेहमीं आपल्या हातून दुसऱ्याचें हित कसें होईल याचाच विचार करी; त्यामुळे तिला स्वतःची पुरी विस्मृति पडत चालली असेंही म्हणायला हरकत नाहीं.

× × × ×

## आत्मीक सामर्थ्यांत वाढ

अशी जरी त्या वेळेपुरती तिच्या मनाची बाह्य वृत्ति होती तरी हृदयाचा खरा ओढा पतीकडेसच लागला असल्यामुळें शरीर विरुद्ध मन अशी तिची अंतःस्थिति होत चालली. तिचें मन, दक्षिणेश्वरी पति-चरणकमलावर रुजी घालण्यासाठीं आतुर झालेलें होतें व तीच सेवा तिला स्वर्गसुखासारखी अनुपम वाटत होती. तरी पण पतिदर्शनासाठी अनावर झालेल्या मनाला आत्मसंयमनाचा बांध घालण्याला ती त्या वेळेपासून खंबीर होत चालल्यामुळें ती चंचल झाली नाही. "प्रथमदर्शनींच ज्यानीं स्वतःच्या अंतःकरणात आपल्याला कायमचा आश्रय दिला व प्रेमळपणानें जवळ घेतलें ते मला विसरतील अशी भीतीच बाळगायला नको. त्याच्या अंदाजाप्रमाणें माझ्या मनाची तयारी होताच व त्यांनीं दिलेले धडे मला अवगत झाल्याचें समजतांच ते आपोआप मला आपल्याजवळ बोलवून नेतील." अशा आशाप्रद विचारानी ती आपलें समाधान करी व तरुण मनाला थाऱ्यावर आणि. यामुळेच मनावर ताबा मिळविणारे तिचें आत्मिक सामर्थ्य तेव्हांपासून वाढीला लागलें मनुष्याला देव बनविण्याची कला परमहंसाच्या अंगी होती.

## गदार बातम्यांचे पीक

अशा प्रकारे दिवसांमागून दिवस जात चालले, आणि 'दक्षिणेश्वरी जाण्याचा मंगल दिवस कधी उगवतो' याची वाट पहात शारदामणीदेवी आपल्या तारुण्याचे

दिवस माहेरी घालवू लागली. या वेळीं आशानिराशेचे जोरदार प्रवाह तिच्या हृदयात समानतेनेच वहात होते. तरी पण एखाद्या आज्ञाधारक मुलासारखे समभावनेत मर्यादेनें राहणाऱ्या तिच्या मनाप्रमाणे, तिचे शरीर मात्र मर्यादित न राहता तिचे मुग्ध तारुण्य विकसित होत चालले व हा हा म्हणता तिला अठरा वर्षे होऊन चुकली. देवासारख्या असणाऱ्या पतीच्या प्रथमदर्शनाने झालेल्या आनंदाने जरी तिचे अन्तःकरण उदात्त आणि सुखी झाले होते, तरी जगाच्या संसारात आनंदाला कायमची जागा कुणाच्याच हृदयात मिळत नसल्यामुळे शारदामणी देवीलाही त्या आनंदात गढून जाता आले नाही. गावातील चार लोक एकत्र जमून गटारबातम्याचा शिंतोडा घालू लागले म्हणजे तो कुणावर कसा उडवेल हें सांगता येत नाही. जयरामवाडी गावातही तसेच झाले. चार लोकांच्या गटार बातम्या शारदामणीच्या नवऱ्याकडे वळल्या आणि त्यांनी रामकृष्ण परमहंसासारख्या सत्पुरुषाला वेडा ठरविले. ‘बेट्याला नेसल्या वस्त्राचीही शुद्ध नाही. आपला नागवा उघडा ‘हरि हरि’ म्हणत नाचत असतो.’ अशा प्रकारच्या चटोर लोकांनी पिकविलेल्या कंड्या बायका पोरांच्या तोंडीं होऊन जेव्हा ही वेड्याची बायको अशा तीक्ष्ण भाऱ्यात शारदामणीच्या कानात शिरू लागल्या, तेव्हा ती जरी तोंडानें कांही बोलली नाही, तरी हृदयाला होणाऱ्या वेदना सहन करणे कठीण होऊं लागले. ती मनात म्हणे, ‘मी समक्ष पाहिलेल्या स्थितीत आणि सध्याच्या अवस्थेत कांही बदल तर झाला नसेल ना? लोक म्हणतात तशी खरोखरच त्यांची स्थिति झाली असेल का? विधिलिखिताप्रमाणें जर तशी गोष्ट होऊन चुकली असेल तर मला असें इथे राहातां नये. तिथे जाऊन त्यांची सेवाचाकरी करणे हें माझे कर्तव्य असल्यामुळें तें मला केलेंच पाहिजे.’ अशा प्रकारच्या सतत विचारानतर शेवटी तिनें ठरविले की, दक्षिणेश्वरी जाऊन समक्ष सगळ्या गोष्टी पहावयाच्या आणि त्यानंतर योग्य दिसेल ते करावयाचें.

## शारदामणीचा पायी प्रवास

अशा तऱ्हेच्या निश्चित विचारानतर तिने दक्षिणेश्वरी जाण्याची तयारी केली. तत्कालीन प्रवास म्हणजे साधी गोष्ट नव्हती. पायी चालणे, चोरचिलटाच्या भीतीतून पार होणें, आणि सर्वांबरोबर मुक्काम गाठणे यात जर थोडीशी चूक झाली तर जीव अगर जिवापेक्षाही जास्त असलेली अब्रू गमावून बसण्याची पाळी यावयाची. तेव्हा लाबच्या प्रवासाला निघावयाचे म्हणजे या सगळ्या गोष्टीचा अवश्य विचार करावा लागे. शारदामणीनें हा सगळा विचार केला होता असे नाही, पण पतिदर्श-नाच्या उत्सुकतेमुळें ती कांहीशी साहसी बनली होती. असो. फाल्गुन महिन्यांतील दोल पौर्णिमेला होणाऱ्या श्रीचैतन्यदेवांच्या जयंतीला गंगास्नानाचे पुण्य मिळावें म्हणून शारदामणी देवीच्या लाबच्या नात्याची कांही मंडळी कलकत्त्याला यायला

निघाली. तेव्हा 'मीही तुमच्याबरोबर येते' असे शारदामणीने त्याना म्हटले. त्यानीं तिच्या बापाला ते तिचे म्हणणे सांगितल्यावर मुलीचा कलकत्याला जाण्याचा हेतू काय असावा हें बापानें जाणले. कलकत्याला जायला रेल्वे नव्हती. अर्थात मेण्यातून अगर पायींच कलकत्याला जाणे भाग होते, पण गरिबाना मेणा कुठचा मिळणार! अर्थात इतर मंडळीबरोबर रामचंद्र मुखोपाध्यायाना आपल्या मुलीसह पायींच कलकत्याच्या मार्गाला लागावे लागले.

शेतामागून शेते आणि कमलांनी परिपूर्ण असलेली अनेक सरोवरे एकामागून एक ओलांडीत, तशीच वड, पिंपळ वगैरे मोठमोठ्या वृक्षांच्या शीतळ छायेला विश्रांति घेत ही प्रवासी मंडळी कलकत्याच्या रोखानें चालली. पहिले एकदोन दिवस सर्वांनाच मौज वाटली, पण शेवटपर्यंत हा आनंद टिकला नाही. पायचालीला अगदींच नवखी असलेली शारदामणीदेवी तर चालता चालता थकून मध्येच तापानें बेसुमार आजारी पडली व रामचंद्र मुकर्जींना मोठी काळजी वाटूं लागली. इतकेंच नव्हे तर अशा स्थितीत पुढें जाणे अशक्य वाटून रस्त्यावरच्याच एका धर्मशाळेंत त्यानी मुक्काम केला.

सकाळी उठून पहातात तो मुलीचा ताप बराचसा कमी झालेला त्यांना आढळला' अर्थात रस्त्यात असे पडून राहण्यापेक्षा थोडे थोडें चाललेलें बरें असें त्याना वाटले, मुलीचेंही अनुकूल मत पडले तेव्हा सकाळच्या रामपाऱ्यांत त्यानी हळूंहळूं चालायला सुरवात केली. पुढे दैवाने त्याना एक मेणाही मिळाला. वाटेत शारदामणीला ताप आला नाहीं असें नाहीं; पण पूर्वीइतका आला नाही. त्यामुळें प्रवास चालू राहिला. शिवाय तिला शक्य तो लवकर पतीकडे जावयाचे असल्यामुळे तिनें आपल्या तापाच्या बाबतीत कुणाकडे अक्षरही काढले नाहीं. अशा रीतीने जाता जातां ती सगळी मंडळी रात्री नऊ वाजतां दक्षिणेश्वरीं पोंचली.

## रामकृष्णाकडून सेवा

अशा प्रकारच्या आजारी स्थितीत प्रवासाचे त्रास सहन करून आपली पत्नी आपल्याला भेटायला आल्याचे पाहून रामकृष्णाना फारच वाईट वाटलें. बाहेरची थंड हवा लागून तिचा ताप वाढेल असें त्याचे मन त्यांना सांगूं लागल्यामुळें त्यानीं खास आपल्या खोलीत स्वतःच्या बिछान्याशेजारी तेवढ्यातल्या तेवढ्यात दुसरा बिछाना घालून तिच्या झोपण्याची तात्पुरती व्यवस्था केली. इतकेंच नव्हे तर ते वात्सल्यपूर्ण वाणीने तिला म्हणाले, "तूं येतां येता इतक्या दिवसांनी आलीस ती अवेळीं आणि तुला फारच त्रास झाला! बरं, दिवसहि हे असे. मथुरबाबू असता तर तुझ्या पथ्यापाण्याचा त्यानें तावडतोब सगळा बंदोबस्त केला असता. तो

तर इथे नाही. तुझी व्यवस्था होणार कशी ?" आपल्या पत्नीच्या आजारीपणासंबंधाने त्यांना मोठी चुटपुट लागून राहिली, पण पुढे योग्य औषधोपचार झाल्यामुळे तीन चार दिवसांनी आई शारदामणीदेवीला बरे वाटले.

हे तीन चार दिवस रामकृष्णानी अहर्निश तिला स्वतःच्या खोलींत ठेवून आपल्या देखरेखीखाली सगळी शुश्रुषा चालविली होती. नंतर तिला बरे वाटल्यावर नौबतखान्यात वृद्ध मातोश्री चंद्रामणीदेवी राहात होती तेथे तिच्या राहण्याची सोय केली; पण शारदामणीदेवीला जें काय समजायचें होतें ते थोड्या सहवासातही समजून चुकले व पूर्वीपेक्षाही तिची त्यांच्याबद्दलची पूज्यबुद्धी वाढली. 'आपले पतिराज पूर्वी जसे होते तसेच आहेत, त्याना वेड लागले वगैरे बातम्या खोट्या आहेत व आपणावर त्यांचे निरतिशय प्रेम असून करुणेनें त्यांचें अंतःकरण भरून गेलें आहे.' असे तिनें स्पष्ट आपल्या बापाला बोलून दाखविलें. इतकेंच नव्हे तर अंतःकरणपूर्वक मोठ्या उल्हासानें तिनें म्हाताऱ्या सासूची व ब्रह्मैष उपासनेंत आणि ज्ञानचर्चेंत गढून गेलेल्या नवऱ्याची सेवा करण्याला सुरवात केली. ती या सेवाकार्यात गढून गेल्याचे पाहून व तिची उल्हसित मुद्रा अवलोकन करून बापालाही समाधान वाटलें आणि तो कांहीं दिवस तेथें राहून सुखासमाधानें घरीं गेला.

---

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

**ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स**

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स**

# आद्य श्री शंकराचार्यांच्या कामगिरीचें महत्त्व

प्रत्येक युगाची गरज वेगवेगळी असते व ती जाणून लोकांना धर्माची व स्वकर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी थोर अवतारी पुरुष जन्माला येत असतात. कलियुगात नाना मते, नाना धर्म निर्माण होऊन जनता सशयात पडली होती. आपण कोणत्या मार्गाने जावे, काय करावे व काय करू नये याबद्दल मनांत सभ्रम उत्पन्न झाला होता. ज्यावेळीं व्यास महर्षीची जरूरी होती त्यावेळी भगवत व्यासाच्या रूपाने अवतीर्ण झाले त्याचप्रमाणे कलियुगात सशयी स्थिति निर्माण झाली असतां ती दूर करण्यासाठी व सद्धर्माची स्थापना करण्यासाठी श्री आद्य शकराचार्यांचा जन्म झाला. त्यानी केलेल्या महान् कार्यापैकी तत्कालीन मतभेदाचे वादळ नाहीसे करून व ज्या व्यक्ति सनातन धर्माआड येत होत्या त्याना वादात जिंकून त्यानी सतातन धर्माची स्थापना खबीर पत्यावर केली. उपनिषदांनी आम्हाला जो वेदान्त धर्म देऊन ठेविला आहे, ब्रह्मसूत्रे व गीता यांच्यारूपाने जो आमच्यासाठी सुलभ करून ठेवण्यात आलेला आहे त्याची पुनश्च स्थापना ही त्याची सर्वात मोठी कामगिरी होय. चुकीच्या समजुती व चुकीची मते होती. त्यानी वादविबादात सपूर्ण यश मिळवून ती खोडून काढिली. कलियुगात कार्य करायचें ही गोष्ट सोपी नव्हती. त्यांच्या अडथळे थोडे थोडके का आले ? फार काय ? त्याच्यावर तीन वेळा हल्ले करण्यांत आले व अशा रीतीनें त्याना जमीनदोस्त करण्याचेहि प्रयत्न झाले ! ते हल्ले खरोखर प्राणघातक होते. अशापैकी दोन हल्ल्यांतून त्यांचे शिष्य भगवान श्रीपद्म पोदाचार्य यांनी त्यांची सुटका केली व तिसऱ्या हल्ल्यातून सुधन्वा नामक राजानें त्यांची सुटका करविली.

### सनातन वैदिक धर्माची स्थापना

अधर्माची चलती होऊं पहात होती. जिकडे तिकडे अधर्म बोकाळला होता. तो हाणून पाडून त्याठिकाणी सनातन वैदिक धर्माची स्थापना होणे जरूर होते. ती त्या काळाची फार मोठी गरज होती. ती त्यानी उत्तम प्रकारे व यशस्वी रीतीने भागविली. त्यानी आपल्या काळात स्वतःवरील जबाबदारी प्राण पणास लावून भागविली असें म्हणणे वावगे होणार नाही. आणि त्यानंतर त्याच्या गादीवर जे जे महापुरुष आले त्याच्या वाट्यालाही कमीअधीक प्रमाणात तो वारसा आलेला होता. त्यानीही तो अखंड चालविला आहे.

श्रीरामानुचार्य, श्रीमाधवाचार्य, श्रीवल्लभाचार्य यानी आपआपल्या मतीनुसार धर्माला जरूर तें स्वरूप देऊन धर्मग्लानी टाळण्याचा व सनातन धर्माची महती

पटविण्याचे कार्य पार पाडिले आहे; परंतु कलियुगातील आद्य आचार्यांचा मान जर कोणाकडे जात असेल तर तो श्रीआद्य शंकराचार्यांकडेच होय.

भारताचा सनातन वैदिक धर्म हा सर्वांत मोठा आधार व आसरा आहे. तो तर आमच्या धर्माचा खंबीर पाया आहे. तो डळमळू लागला असता, भारताच्या कोनाकोपऱ्यात संचार करून व विरोधकाचा समाचार घेऊन व वादात त्यांचा पराभव करून सनातन वैदिक धर्माची धवळ पताका डौलाने फडकवीत ठेवण्याचा मान यावरून कोणा एकाकडे जात असेल तर या कलियुगात तो आद्य शंकराचार्यांकडे जातो असेच म्हणावें लागेल.

सनातन धर्माची ध्वजा फडकवीत ठेवणे ही त्या काळातील कामगिरी ल्हान-सहान नव्हती. फार महत्वाची होती ती कामगिरी ! ती पार पाडून त्यांनी तदनंतरच्या शंकराचार्यांवरील जबाबदारी हलकी करून ठेविली.

**श्री शंकराचार्यांचा पराक्रम**

आद्य शंकराचार्यांचा पराक्रम शांकर दिग्वीजयात विस्तारपूर्वक सांगण्यात आलेला आहे. तो पाहिला म्हणजे त्यांच्या थोरवीची सार्थ कल्पना करता येते. तो महान् पराक्रम पाहिला म्हणजे तत्पूर्वीच्या काळात धर्मरक्षणासाठी भगवान दक्षिणा-मूर्ति, भगवान् दत्तात्रय व भगवान् वेदव्यास यांच्यासारखे जे थोरात थोर अवतारी महापुरुष होऊन गेले त्यांच्याच तोडीचे, त्यांची गादी शोभविणारे असे श्रीशंकराचार्य होऊन गेले याबद्दल खात्री पटल्याशिवाय रहाणार नाही. या कलियुगाचे पहिले ज्ञान-गुरु तेच होत.

आज धार्मिक दृष्ट्या आपली पातळी खालावलेली आहे हे मान्य करूनही आमची मान जगात अध्यात्मिक दृष्ट्या जर कोणत्या कारणामुळें उंच राहिली असेल तर ती म्हणजे आद्य शंकराचार्यांनी अद्वैत सिद्धांताची या देशाला देऊन ठेविलेली बहुमोल देणगीच होय.

अडीच हजार वर्षे होऊन गेली त्या काळाला. कलियुगातील अज्ञान जनतेत ज्ञानदीप पाजळून त्यांनी तिला खडबडून जागे केले.

उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे वगैरे आमची जी बहुमोल रत्ने आहेत त्यांना जरूर ते पैलू पाडून आमच्या त्या खजिन्याचे दिव्य स्वरूप दाखवून देण्याची थोर कामगिरी त्यांनीच पार पाडिली. त्यांनी झगझगीत प्रकाश पाडून तो अंधारात पडलेला खजिना आमच्या नजरेला दाखवून दिला. कार्लाईल, इमर्सन वगैरे परदेशीय पंडितांनी त्या दिव्य व तेजस्वी खजिन्याकडे पाहून माना डोलविल्या व त्यापासून स्फूर्ति घेतली. एवढेच नव्हे तर आपले व इतर असंख्य लोकांचे जीवन उजाळून सोडले.

अशा त्या थोर महाभागाला कृतज्ञतापूर्वक शतशः वंदन !

---

# स्वामी विवेकानंद आणि त्यांची शिकवण

***********************************************

**लेखक : पु. वा. कुळकर्णी**

**स्वामी विवेकानंद यांस या भरतभूमीत जन्म घेऊन गेल्या महिन्याच्या १७ तारखेस शंभर वर्षे पूर्ण झालीं. स्वामीजींचें कार्य व त्यानी भारतवासीयांस आपल्या अमोघ वाणीनें व लेखनानें दिलेली प्रेरणा वर्णनातीत आहे. सध्यां भारतभर त्यांचा जन्मशताब्धि महोत्सव सुरू असून तो वर्षभर चालू रहावयाचा आहे. पुढील लेखावरून स्वामीजीच्या महान् कार्याची सर्वसाधारण कल्पना करतां येईल.**

भारत व अमेरिका या दोन राष्ट्रांचे संबंध आज कितीतरी दृढ व जिव्हाळ्याचे होऊन राहिले आहेत. परस्परातील हा स्नेहभाव उत्तरोत्तर अधिकाधिक वृद्धिंगत होत जावा यासाठीं दोन्ही राष्ट्रें आपापल्यापरीनें झटत आहेत; परंतु या मैत्रीचा व सद्भावनेचा खंबीर पाया जर कोणी प्रथम घातला असेल तर तो स्वामी विवेकानंद यानीच होय. वेदान्ताची पताका त्यानीच शिकागो शहरीं मोठ्या डौलानें व परिणामकारकरीतीनें फडकविली. या घटनेला आतां सत्तर वर्षें होऊन गेली आहेत. ज्या धर्मशिक्षण कार्याचा पाया त्यानीं घातला ते कार्य त्या देशांत आजहि चालू आहे.

शिक्षण, उद्योगधंदे, संपत्ति, शस्त्रास्त्रे व नवनवें शोध वगैरे बाबतींत अमेरिका कितीहि सुसंपन्न असली तरी व्यक्तिमात्राच्या जीवनात शाश्वत आनंद देणारा असा अध्यात्माचा, धर्मशीलतेचा ठेवा अमेरिकेजवळ नसून तो भारताजवळ आहे. भारत इतर बाबतींत दैन्यावस्थेंत असला तरी त्या अमोल ठेव्याच्या बळावर कितीहि संकटें आली तरी गेल्या हजारो वर्षांपासून आपली मान उंचावून साऱ्या जगापुढें खडा आहे.

### भगवंताच्या भेटीची उत्कंठा

स्वामी विवेकानंद यास भारताबद्दल किंवा भारतवासीयांबद्दल खोटा अभिमान वाटत नव्हता. भारतांतील दैन्य, खडतर दारिद्र्य व घोर अज्ञान पाहून त्याचा जीव तीळ तीळ तुटत होता. वेद व उपनिषदें यांनी ज्या हिंदु धर्माचा पाया रचिला त्याला जी नाना बंधनें व बाडगुळें चिकटविण्यांत आलीं त्यामुळें खऱ्या हिंदुधर्माचा होत असलेला कोंडमारा त्याना असह्य झाला व त्यामुळें राजा राममोहनराय यांनी स्थापन केलेल्या व केशवचंद्र सेन, देवेंद्रनाथ टागोर व प्रतापचंद्र मुजुमदार वगैरे तत्कालीन

धर्मनेत्यानीं जोपासलेल्या ब्रह्मसमाजाकडे ते वळले. तेथे ते कांही काळ वावरले परंतु त्याच्या मनाचे समाधान काही केल्या होईना. त्याना देवाच्या भेटीची उत्कंठा लागून राहिली होती. त्यासाठी ते बेचैन झाले होते. हा बेचैनपणा किंवा ही आंतरिक तळमळ देवाच्या कानापर्यंत जाऊन पोहोचली आणि त्याच्याच कृपाप्रसादाने त्यांची व श्रीरामकृष्ण परमहंस याची भेट घडून आली. देवदर्शनानें पुण्यपावन झालेले व दैवी जीवन घालविणारे ते महापुरुष होते. ज्याना आपल्या देहाची किंवा कशाचीहि जाणीव नाही अशा थोर परमहंस पदाला पोहोचलेले ते होते. हिंदुधर्माचे पुनरुत्थान करण्यासाठी व देशोन्नतीच्या कार्यातील आपला वाटा उचलण्यासाठी स्वामी विवेकानंद याच्यासारख्या सत् शिष्याची त्याना फार जरूरी होती. ते वाटच पहात होते. त्यानी नरेंद्राची ( हे स्वामी विवेकानंदाचें पूर्वाश्रमीचे नाव ) इच्छा पूर्ण केली.

देवाचिया भेटीसाठी । पडाव्या जिवलगाच्या तुटी ॥ तसेच अक्षरशः घडून आले. नरेंद्रावर कौटुंबिक जबाबदारी होती, परंतु ते आतां विश्वकुटुंबी बनले होते. आपल्या एका कुटुंबाचे काय ? देव त्याचे कसेंहि चालविल. आणि त्यासबंधीं मनात एकदा शंका आली असता रामकृष्णानी त्याना आश्वासिलें होते कीं, तुझ्या कुटुंबांतील मंडळी चैनीत राहू शकली नाहीं तरी सुखासमाधानांत रहातील. तू चिंता करूं नकोस ईश्वर त्यांची काळजी वाहील. आणि घडलेंहि तसेंच.

## स्वामीजींचें देशपर्यटण

गुरुकृपेची जोड संपादन करून स्वामी विवेकानंद निश्चित मनानें देवदर्शनासाठीं बाहेर पडले. आज संकटांत सापडलेल्या हिमालयाची हाक त्यांना प्रथम ऐकू आली. त्या पवित्र सृष्टिसौंदर्यानें नखशिखांत नटलेल्या प्रदेशात कांहीं काळ घालवून ते खाली उतरले व राजस्थान, काठेवाड, गुजरात, मद्रास वगैरे सर्व प्रांतातून हिंडले फिरले. त्यांना लोकस्थितीची जाणीव करून घ्यायची होती. जनतेचे दारिद्र्य व खडतर अज्ञान त्यांना सर्वत्र आढळून आलें. भारताला आज कशाची खरीखुरी जरूरी असेल तर ती धर्माची नसून पोटभर भाकरीची आहे. खोट्यानाट्या धर्मबंधनांच्या व जातिभेदांच्या शृंखला तोडून टाकल्याशिवाय जनतेची सुधारणा होणार नाहीं व त्यासाठीं आपण शक्य ते प्रयत्न करावयाचे असा त्यानीं निर्धार केला. आपल्या धावत्या दौऱ्यात त्यांना घराघरांतून व रानावनांतील झोपड्यांतून जें अपार दुःख, दैन्य व अज्ञान आढळून आले त्यामुळें त्यांच्या अंतःकरणाला दारुण वेदना झाल्या. त्यामुळें कित्येक रात्री त्यांनीं रडून काढल्या. त्यांना आपल्या सभोवार जी भीषण स्थिति आढळून आली त्यामुळे स्वतःच्या मुक्तीसाठी देवाची भक्ति करण्यांत काळ कंठण्यापेक्षां दीनदुबळ्यांची सेवा करण्यांत काळ घालविणें त्यांना अधिक महत्त्वाचें वाटू लागलें.

### खरा मोक्ष कशांत आहे?

एकदा एका प्राध्यापकाची व त्यांची भेट झाली. प्राध्यापक महाशय म्हणाले, "जनसेवेत काळ घालवावा म्हणून सांगता, परोपकारासारखं पुण्य नाही नाही म्हणता, याचा अर्थ मायाजालात सापडण्यासारखाच आहे नाही का? आणि वेदान्ताची शिकवण तर अशी आहे की, मुक्ति मिळविणे हे प्रत्येक माणसाचे साध्य आहे. मायेचे जाळे तडातड तोडून मोकळे झाल्याशिवाय माणूस मुक्ति कशी मिळवू शकणार?"

यावर स्वामीजी म्हणाले, "मुक्तीची कल्पना मायेच्या क्षेत्रात येत नाही का? आत्मा सदासर्वकाळ स्वतन्त्र आहे ही वेदाची शिकवण आहे. त्या आत्म्याला तुमच्या मुक्तीची जरुरी कुठे आहे?"

पुढे ते म्हणाले की, "माझ्या आयुष्यातील काही काळ मी ध्यानधारणेत, एकान्तवासात घालविला आहे. तें सर्व करून चुकलो आहे. मुक्ति मिळावी म्हणून कित्येक दिवस सतत उपासतापास करण्यातहि घालविले आहेत; परतु माझे देशबांधव अर्धपोटी व अर्धनग्न स्थितीत जीवन कसेबसे कष्टात घालवीत असतां मी स्वतःच्या मोक्षासाठीं धडपड करावयाची, यात माणुसकी नसून माझ्या देशबांधवांचे दैन्य व दारिद्य दूर करण्यासाठीं झटण्यांतच खरा मोक्ष आहे; तीच खरी देवसेवा. देव देवळात नाही तर तो दुःखदारिद्यात काळ कठणाऱ्या गरिबांच्या झोपडीत आहे, अशी माझी पूर्ण खात्री झाली."

कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या एका बंगाली गीताचे स्मरण येथे आम्हाला झाल्याशिवाय रहात नाही. ते म्हणतात—

"वैराग्य साधने मुक्ति से आमार नय
असख्य बंधन माझे महानंदमय लभीव मुक्तीर लाभ"

वैराग्यसाधन करून मुक्ति मिळवायची ती मला नको. नाना प्रकारच्या बंधनात व जनकल्याणाच्या व्यापांत गुंतून वेऊन त्यातच मी ब्रह्मानंदाचा वा मुक्तीचा लाभ संपादन करीन.

### शिकवणुकीचें सार

भारतदर्शनाचा त्याचप्रमाणे यूरोप-अमेरिकेचा यशस्वी दौरा संपवून मायदेशी प न आल्यानतर किंवा परदेशांत असतांहि त्यांनी जें जे काही केलें त्याचा मध्यबिंदू जनसेवा होता. स्वामी विवेकानंद यांच्या शिकवणुकीचे थोडक्यांत सार काय? म्हणून कोणी विचारले तर त्याला उत्तर वर त्यांनी एका प्राध्यापकला दिले आहे ते असे आम्ही सांगू.

स्वामी विवेकानंद हे जेथे जेथें गेले तेथें तेथे आपल्या असामान्य व्यक्तित्वाच्या, विद्वत्तेच्या व त्यागमय जीवनाच्या बळावर त्यानी प्रत्येकावर आपली छाप बसविली. कितीतरी बाबतीत आद्य शंकराचार्यांशी त्याची तुलना करता येण्यासारखी आहे. त्या काळांत भारताला जशी शंकराचार्यांची जरूरी पाखंडी मताचे खंडन करून अद्वैत सिद्धांताच्या प्रसारासाठी भासली, त्याचप्रमाणें हिंदु धर्मात नवचैतन्य निर्माण करणाऱ्या वेदान्ताचा संदेश यूरोप अमेरिकेतील लोकाच्या गळी उत्तरविण्यासाठी स्वामी विवेकानंदाची जरूरी होती. हिंदु धर्मातच नव्हे तर भारतीयात नवचैतन्य, निर्भयता लोकसेवापरायणता व वीरश्री निर्माण होणें अत्यत जरूरीचें होते. आपल्या वीरवाणीने विवेकानंदानी ते कार्य परिणामकारक रीतीने घडवून आणिलें. शंकराचार्यांप्रमाणे विवेकानंदाचे या पृथ्वीतलावरील वास्तव्य अल्पजीवी होतें; परंतु त्यानी अवघ्या १२।१३ वर्षात जे असामान्य कर्तृत्व प्रगट केलें ते मात्र चिरंजीवी ठरलें आहे.

स्वामी विवेकानद म्हणजे जिवंत स्फूर्तीचा अखंड व झुळझुळ वहाणारा पवित्र गंगेचा प्रवाह. त्या प्रवाहांत अवगाहन करून भारतांतील निरनिराळ्या प्रातात रहाणाऱ्या असंख्य तरुणांनी आपल्या जन्माचे सार्थक व सोनें करून घेतल्याचें आम्हीच काय पण कोणीहि सांगू शकेल.

## विद्यार्थि दशेंतील आठवण

या ठिकाणीं आमच्या विद्यार्थी दशेतील एक आठवण जातां जाता टिपण्याचा मोह आम्हाला आवरतां येणें कठीण झालें आहे. सुमारें चाळीस वर्षापूर्वीची गोष्ट. मुंबईतील आर्यन एज्युकेशन सोसायटी शाळेंत आम्ही कांहीं विद्यार्थी सहाव्या इयत्तेत शिक्षण घेत होतो. तेथें आमच्या सुदैवानें पी. डी. चित्रे, बी. ए. हे विवेकानंद–वेडे शिक्षक आम्हाला लाभले होते. रोज सायंकाळीं शाळा सुटली म्हणजे त्याच्या आदेशाप्रमाणे आम्हीं चौपाटीच्या वाळवंटावर जमावें. त्याकाळी सध्यासारखी भेळपुरीवाल्यांनी चौपाटीवर गर्दी व गोंगाट केलेला नव्हता. तेथील शांत वातावरणात चित्रे गुरुजींनी आम्हां विद्यार्थ्यांपुढें विवेकानंदांच्या शिकवणुकीवर एखादें प्रवचन द्यावे. मूळ शिकवणच इतकी प्रभावशाली व अंतःकरणाचा ठाव घेणारी होती कीं, त्या शिकवणुकीचा अधिकाधिक अभ्यास करावा अशी प्रत्येकांत जिज्ञासा उत्पन्न झाली. आमच्या सोबत्यापैकी एकाचे नाव होतें पाच्छापूरकर. त्याच्या मनावर चित्रे गुरुजींच्या प्रवचनाचा इतका परिणाम झाला की एके दिवशी शाळा व मुंबई सोडून ते कोठे तरी अज्ञात स्थळीं निघून गेले. पुष्कळ वर्षांनीं समजून आलें कीं, ते मुंबईहून थेट हिमालयावर गेले. तेथे अनेक वर्षें राहून ज्ञानसंपदेचे गाठोडे बरोबर घेऊन आले आणि उत्तर हिंदुस्थानात त्यानी स्वतःला राष्ट्रसेवेला वाहून घेतले. त्या भागांत राहून गेल्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी फार महत्त्वाची कामगिरी बजावली. त्या भागात ' बाबा राघवदास ' या नांवानें

ते महशूर होते. २।३ वर्षापूर्वीच त्यानी इहलोकची आपली कर्तृत्वसंपन्न यात्रा सपविली. आमच्या प्रत्यक्ष माहितीतलें असे हें एक उदाहरण आहे. अशा प्रकारची स्फूर्ति भारतांतील हजारो तरुणानी मिळविली असेल व पुढेंहि मिळवीत राहतील. कारण वर म्हटल्याप्रमाणे विवेकानंदाची शिकवण म्हणजे चैतन्याचा गाभा आहे. त्यात अपरपार ओज व तेज आहे.

१८९३ साली अमेरिकेंतील शिकागो शहरी भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेला हजर राहून तेथें आपल्या ओजस्वी व अमोघ वाणीनें सर्वांना थक्क करून सोडीपर्यंत स्वामी विवेकानंद याची फारशी माहिती त्याच्या ठिकठिकाणच्या शिष्य व मित्रपरिवार याशिवाय फारशी कोणाला नव्हती. त्या परिषदेंतील त्यांच्या दिव्य वाणीनें अमेरिकन जनता हादरली गेली असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. भारताकडे व भारतवासियांकडे पहाण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलूं लागला.

**एक महत्वाची घटना**

या ठिकाणीं एका महत्वाच्या घटनेचा उल्लेख करणें जरूर आहे. युरोप अमेरिकेंत जाऊन हिंदुधर्माची पताका तिकडे फडकविण्याचा सुविचार आग्रहपूर्वक त्याच्यापुढें प्रथम मांडणारा एक थोर महाराष्ट्रीय होता. त्याचें असें झालें. १८९२ साली स्वामी विवेकानंदांनी गुजरात काठेवाडमध्यें दौरा काढला होता. फिरत फिरत ते पोरबंदर संस्थानात आले. त्यावेळी त्या संस्थानचे कारभारी होते रा. ब. शकर पांडुरग पंडित. न्यायमूर्ति माधवराव रानडे यांचे परम स्नेही या नात्यानें महाराष्ट्र त्याना ओळखतो. ते संस्कृत व लॅटिन ह्या दोन्ही भाषाचे जाडे पंडित होते. पोरबंदर येथें असता व तत्पूर्वी त्यांनीं वेदाचें इग्रजी व मराठी भाषातर चालविलें होतें. त्यांच्या सपादकत्वाखाली 'वेदार्थयत्न' या नावाचें एक मासिकहि तत्पूर्वीच्या काळात चालू होतें. भारतापेक्षा इंग्लंड, जर्मनी यासारख्या परदेशांत त्या मासिकास जास्त ग्राहक लाभले होते. वेदान्त हा स्वामीजींचा आवडीचा विषय त्यामुळें तेथें ते रमले व दीर्घकाल राहिलेहि. त्यांची बुद्धिमत्ता, कल्पकता व इतर गुण यांमुळे शंकरराव अक्षरक्षः भाळले गेले. एके दिवशीं ते स्वामीजींना म्हणाले, "स्वामीजी! तुमच्या बुद्धिमत्तेचें चीज या देशांत होण्याची मला तरी शक्यता दिसत नाही. तुम्हीं युरोप अमेरिकेत कां जात नाही व तिकडे आपल्या वेदान्ताचा प्रचार कां करीत नाहीं? ते लोक निश्चित तुमचें कौतुक करतील असें मला तरी वाटतें."

हे स्वानुभवाचे बोल होते. रा. ब. पंडित यांस लंडन येथें भरलेल्या प्राच्यविद्यापरिषेदेच्या बैठकीसाठीं सरकारतर्फें पाठविण्यांत आलें असतां तेथें त्यानीं कालिदासावर वाचलेल्या प्रबधाचें विद्वानांकडून कौतुक करण्यांत आलें होतें. स्वामीजींच्या दृष्टीनेंहि ती सूचना महत्त्वाची होती. तशा प्रकारचा विचार त्यांच्या मनांतही

घोळत होता. कोणी तरी त्या विचारास तोंड फोडण्याची जरूरी होती. परंतु तेवढ्यानें भागण्यासारखे नव्हते. ते ईश्वरी आदेशाची वाट पहात होते. कारण स्वामीजी मद्रासेस असता तेथील त्यांच्या मित्रांना व शिष्यांना त्या विचाराची जाग लागून यूरोप अमेरिकेच्या यात्रेसाठी त्यानी जरूर तो निधी उभा करून तो स्वामीजींच्या स्वाधीन केला आणि त्यांनीं तो सारा पैसा गोरगरिबांस वाटून टाकला. कारण ते ईश्वरी आदेशाची वाट पहात असे.

## एका संस्थानिकाची निष्ठा

आणि योग्य वेळी तो सुयोग जुळून आला. ईश्वरी लीला अगाध आहे. तो कोणाला कशी प्रेरणा करील आणि तुमचें कार्य यशाप्रत नेईल हें सांगतां येणें कठीण आहे. खेत्री संस्थानच्या महाराजाची स्वामीजींवर भारी निष्ठा होती. त्यांना पुत्रसंतती नव्हती. तो लाभ त्यांना स्वामीजींच्या आशीर्वादानें झाल्यामुळें त्याची श्रद्धा दुणावली. त्यांनी पुढाकार घेऊन स्वामीजीच्या अमेरिका दौऱ्याची सारी व्यवस्था स्वेच्छेनें केली.

चमत्काराशिवाय नमस्कार नाही असें म्हणतात. व या जगांत त्याचा अनुभव पदोपदीं येतहि असतो. परंतु स्वयंसिद्ध व समर्थ असताहि स्वामीजींनीं तो पतनाचा मार्ग कधीं स्वीकारला नाहीं. खेत्री महाराजांची इच्छा पूर्ण झाली याला कारण त्यांना मिळालेला आशीर्वाद हा साक्षात्कारी सत्पुरुषांचा आशीर्वाद होता; कसेंहि असो. चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य आपल्या ठायी आहे अशा प्रकारचा आभास त्यांनी कधींही निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाहीं. ईश्वरानें त्यांना अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्व व परिणामकारक अमोघ वाणी याची जोड दिलेली होती. त्याच्या बळावर ज्या ज्या भागात ते गेले त्या त्या ठिकाणचे लोक त्याच्याकडे आकर्षिले गेले.

अमेरिकेंतील दिग्विजयी दौरा संपवून ते मायदेशीं परतले आणि भारतीय जनतेच्या उद्धारकार्यास त्यांनी स्वतःस वाहून घेतले. कोट्यावधी लोकानीं गजबजलेला हा देश ! अशा या प्रचंड देशांतील लोकांचें अज्ञान व खडतर दारिद्य दूर करणें ही का सहजसाध्य गोष्ट होती ? शिवाय परकीय राजसत्तेचा सर्व बाबतीत प्रतिकूल अंमल ! धैर्याचा तो हिमालय त्यामुळें निराश झाला नाहीं किंवा खचून गेला नाहीं. निराशा किंवा भयभीति त्यांच्या वाऱ्यास केव्हांहि उभी राहूं शकली नाही.

## स्वामीजींचें कार्य

अमेरिकन लोकांची गरज ओळखून त्या देशांत त्यांनी जागोजाग शिक्षणकेंद्रें स्थापन केलीं त्याचप्रमाणें या देशांत येतांच त्यांनीं ठिकठिकाणीं आश्रम किंवा मठ स्थापन करून ते योग्य माणसांच्या हवालीं केले. सन्यस्त वृत्तीनें रहाणारा व निःस्वार्थपणें देशसेवेला वाहून घेतलेला असा एक कार्यकर्त्यांचा वर्ग तयार करण्याची जरूरी त्यांना

भासू लागली होती. तसा वर्ग निर्माण करण्यात त्यानी यश मिळविलें. देशसुधारणेचा हा जो झेंडा त्यानी उभारला त्याच्या छायेखाली जमा होऊन त्याच्या मार्गदर्शनानुसार देशकार्य करण्यासाठी याच देशातील नव्हे तर यूरोप अमेरिकेतील स्त्रीपुरुषहि त्याना येऊन मिळाले.

सुमारे ६०।७० वर्षापूर्वीच्या काळात परकीय सत्तेच्या अमलाखाली त्यानी सुरू केलेले ते कार्य आजहि स्वतत्र भारतात प्रातांप्रातांतून अखड चालू आहे. आजहि त्याकाळी त्यानी दिलेला देशोद्धाराचा अमृततुल्य सदेश सर्वांना स्फूर्ति देत आहे.

स्वामी विवेकानद यानी पाऊणशे वर्षापूर्वीच्या काळात देश व जनता याच्या उद्धाराच्या दृष्टीने जे जे काही सागितलें तें आजच्या काळालाहि तंतोतत लागू पडणारे आहे. पूर्वस्थितींत थोरपालट घडून आला असला तरी तो अत्यल्प प्रमाणात, आणि म्हणूनच त्याच्या तेजस्वी व ओजस्वी शिकवणुकीकडे लक्ष पुरवून ती आत्मसात् करण्याचा कसून प्रयत्न झाला पाहिजे.

## चालू वर्षाचें महत्त्व

चालू वर्ष हें स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दीचें आहे. छत्रपति शिवाजी महाराज याच्या कर्तृत्वाची बरोबर व अचूक कल्पना आम्हांला तीनशे वर्षानंतर होऊं शकली. चालू स्वातत्र्य काळात त्याच्या कामगिरीचें आम्हीं यथायोग्य मोजमाप करू शकलो व त्याचप्रमाणे स्वामी विवेकानदाच्या जीवनकार्याची वास्तव महती व्यापक स्वरूपात करून देणारे हे चालू वर्ष असून सध्या ज्या परिस्थितीतून आम्ही जात आहोत त्या परिस्थितीला सर्वतोपरी पोषक होऊन राहील अशीच स्वामीजींची संजीवन देणारी शिकवण आहे.

स्वामीजींनीं आपल्या आयुष्याचा एकहि क्षण वाया दवडला नाहीं. त्याचे शिकणें व शिकविणें अखड चालू होतें. त्यानीं लेखनहि अपरंपार केलें आहे. ते सारे इंग्रजीत व क्वचित् बंगालीतहि आहे. सेवाभाव हा त्यांचा अत्यंत आवडता विषय. त्या विषयावरील त्याचे काहीं विचार केवळ वानगीदाखल येथें देण्यात येत आहेत.

"देवाची पूजाअर्चा करावयाची म्हणजे काय बरे करायचे ? स्वतः भला होऊन इतरेजनाशी भलेपणानें वागावयाचे. शिवशंकराची किंवा तुमचें जे काही आराध्य दैवत आहे त्याची पूजा तुम्ही कशी बांधणार ? जे जे गरीब, रोगी, दुःखीकष्टी आढळून येतील त्यांच्या सहाय्यार्थ धावत जाऊन त्याच्या दुःखनिवारणार्थ जे जे करता येईल ते करणें हीच शिवोपासना. कारण शिवाचे वास्तव्य त्याच ठिकाणी असते हे निश्चित समजा. तुमच्या दृष्टीस एखादा गरीब माणूस पडला तर तो कोणत्या जातीचा, तुमच्या

दृष्टीने उच्च कीं नीच कुळांत जन्मलेला हा विचार मनांत न आणता तो प्रति शिव आहे या भावनेने तुम्ही त्याची सेवा करा. देवळातल्या मूर्तीला धूपदीप दाखविण्यानें तो तुमच्यावर राजी होणार नाही इतका त्या गरिबाच्या सेवेनें तो राजी होईल.

स्वार्थासारखें दुसरें कोणतेंहि पाप नसेल. मी प्रथम खाणार–जेवणार, इतरांपेक्षा मलाच जास्त मिळालें पाहिजे मलाच सर्व प्रकारचे सुखोपभोग लाभले पाहिजेत. नतर कोणाही अगोदर मी मोक्षाला गेले पाहिजे. अशा प्रकारचे ज्याचे विचार आहेत तो स्वार्थी व आपलपोट्या होय. निःस्वार्थ माणूस काय म्हणतो माहीत आहे? माझा क्रमांक सर्वांच्या शेवटीं! मी मुक्तीची किंवा स्वर्गाची अपेक्षा करीत नाही. माझ्या बंधूभगिनींची सेवा करण्याची संधी भगवंतानें मला द्यावी म्हणजे झालें. तोच माझा मोक्ष असें मी मानीन. माणसाची पारख या कसोटीनें तुम्हीं करूं शकता.

तुमचें तुमच्या सभोंवार वावरणाऱ्या बंधूभगिनींवर प्रेम आहे का? देवाच्या शोधार्थ कशाला ही धावपळ? गरीब, दुःखीकष्टी, आजारी, शेजारी यांच्याठायीं तुम्हीं देवत्व पाहू शकत नाहीं का? मग त्यांच्या सेवेला स्वतःला कां वाहून घेत नाहीं? गंगा नदीच्या किनाऱ्याजवळ विहीर खणण्याची यातायात कशासाठी?"

स्वामी विवेकानंदांचा अमृततुल्य अमर संदेश भारताच्या खेड्यापाड्यांतील जनतेंतून पसरो व भारताच्या सर्वांगीण उद्धारास प्रेरक ठरो हीच प्रार्थना.

---

दिव्य दृष्टीसाठीं TEL GRAM.—DIVYANETRA
शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]
यांच्या येथें तज्ञ डॉक्टराकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.
छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# कर्मसन्यासाचें स्पष्टीकरण

—संत विनोबा

**अकर्मांत अनंत कार्यास लागणारी शक्ति भरून राहिलेली असते. वाफेचें असेंच नसतें का? वाफ कोंडून ठेवली तर प्रचंड कार्य करील. त्या कोंडलेल्या वाफेत अपरंपार शक्ति येते. ती मोठमोठ्या आगगाड्या सहज लीलेने ओढते. सूर्याचें असेंच आहे. तो लेशमात्रही कर्म करीत नाही; परंतु चोविस तास सारखा कार्य करतो. त्याला विचाराल तर तो म्हणेल, "मी कांहींच करीत नाही." रात्रंदिवस कर्म करून कांही न करणे ही जशी सूर्याची तऱ्हा तशीच कांही न करता रात्रंदिवस अनंत कर्मे करणे ही दुसरी तऱ्हा.**

संसार ही फार भयानक वस्तु आहे. पुष्कळ वेळा त्याला समुद्राची उपमा देतात. समुद्रात जिकडे पहावें तिकडे पाणीच पाणी दिसतें. तसेंच संसाराचें आहे. संसार सर्वत्र भरून राहिला आहे. कोणी एखादा घरदार सोडून सार्वजनिक कामांत पडतो तर तेथेहि त्याच्या मनात संसार ठाणे देऊन बसलाच असतो. एखादा मनुष्य गुहेत जाऊन बसला तरी तेथेंहि त्याच्या वीतभर लंगोटीत ओतप्रोत संसार भरून राहिलेला असतो. ती लंगोटी त्याच्या ममतेचें सारसर्वस्व होऊन बसते. लहानशा नोटेत हजार रुपये जसे भरलेले असतात, त्याप्रमाणे त्या लहानशा लंगोटीतहि अपार आसक्ति असते. पसारा सोडला, व्याप कमी केला, एवढ्यानें संसार कमी झाला असे नाही. दहापंचविसांश काय किंवा दोनपंचमांश काय, दोहोंचा अर्थ एकच. घरांत बसा वा वनात बसा आसक्ति जवळच असते. संसार लेशमात्रहि कमी होत नाही. दोन योगी हिमालयाच्या गुहात जाऊन बसले. तेथेंहि परस्पराची कीर्ति परस्पराच्या कानांवर गेली तर ते जळफळू लागतील. सार्वजनिक सेवा करण्यांतहि असाच प्रकार आढळतो.

## राक्षस ते राक्षसच

संसार हा असा हात धुऊन पाठीस लागला असल्यामुळे आपण स्वधर्माचरणाची मर्यादा जरी स्वतःला घालून घेतली असली तरीहि तेथें संसार सुटत नाही. अनेक उलाढाली करण्याचे सोडून, इतर व्याप कमी करून, स्वतःचा संसार जरी लहान केला तरी तेथेहि सारें ममत्व भरून राहतें. राक्षस जसे लहान होत, मोठे होत, तसेच या संसाराचे. लहान मोठे झाले तरी राक्षस ते राक्षसच. दुर्निवारत्व हवेलींत किंवा झोपडींत

सारखेंच आहे. स्वधर्माचे बंधन घालून जरी संसार प्रमाणबद्ध केला तरी तेथेंहि अनेक झगडे उत्पन्न होतील व तुम्हास संसार नकोसा होईल. तेथेहि अनेक संस्था, अनेक व्यक्ति यांच्याशीं संबंध येऊन तुम्ही त्रस्त व्हाल. तुम्हास नको नको असे होईल. तुमच्या मनाची तेव्हाच कसोटी आहे. स्वधर्म आचरूं लागलो एवढयाने अलिप्तता येत नाही. कर्मांची व्याप्ति कमी करणे म्हणजे अलिप्त होणे नव्हे.

मग अलिप्तपणा कसा मिळवावयाचा? त्यासाठी मनोमय प्रयत्न पाहिजे. मनाचा सहकार असल्याशिवाय कोणतीहि गोष्ट सिद्ध होत नाही. एखाद्या संस्थेत आईबाप मुलगा ठेवतात. तेथे तो पहाटे उठतो, नमस्कार घालतो, चहा घेत नाही. परंतु घरी येताच दोन दिवसात तें सारे सोडतो. असे अनुभव येतात. मनुष्य म्हणजे मातीचा गोळा नाही. जो आकार त्याच्या मनास देऊं पहाल तो त्याच्या मनानें घेतला तर पाहिजे ना! मन जर आकारात बसले नाहीं, तर बाहेरची ती सर्व तालीम व्यर्थ गेली म्हणावयाची. त्यासाठी साधनात मानसिक सहकाराची फार आवश्यकता आहे.

### मनाची करामत

साधन म्हणून बाह्य स्वधर्माचरण व आंतून मनाचें विकर्म दोन्ही गोष्टी हव्यात. बाह्य कर्माचीहि आवश्यकता आहेच. कर्म केल्याशिवाय मनाची परीक्षा होत नाही. सकाळच्या प्रशांत वेळी आपणास आपले मन अत्यंत शांत आहे असे वाटतें. परंतु जरा मूल रडूं दे की ती मनाची शांति काय किंमतीची होय. तें दिसून येईल. बाह्य कर्म टाळून उपयोग नाही. बाह्य कर्मांतून आपल्या मनाचें स्वरूप प्रगट होते. वरून पाणी निर्मळ दिसते. परंतु त्यात दगड टाका. लगेच घाण वर येईल. तसेंच आपल्या मनाचें आहे. मनाच्या अंतःसरोवरात ढोपर ढोपर घाण साचलेली असते. बाह्य वस्तूशी संबंध येतांच ही घाण दिसून येते. त्याला राग आला असे आपण म्हणतो. राग का बाहेरून आला? तो आत होताच मुळी. मनात नसता तर दिसताच ना.

लोक म्हणतात, "पांढरी खादी नको. ती मळते रंगीत खादी मळत नाही." तीहि मळतेच; परंतु दिसत नाही. पांढरी खादी मळलेली दिसते. ती बोलते, "मी मळले. मला धू." अशी ही बोलणारी खादी माणसास आवडत नाही. त्याप्रमाणेंच आपलें कर्महि बोलते. कर्म तुम्ही रागीट आहात की स्वार्थी आहात की आणिक काही आहात तें प्रगट करते. कर्म आपले स्वरूप दाखविणारा आरसा आहे. यासाठी कर्मांचे आभार मानले पाहिजेत. आरशांत तोंड मळलेलें दिसलें तर का आपण आरसा फोडूं? नाही. उलट त्या आरशाचे आभार मानू. तोंड स्वच्छ करून पुन्हा पाहूं. त्याप्रमाणें कर्मांमुळे आपल्या मनातील खळमळ

बाहेर पडतात म्हणून का कर्म टाळावयाचें ? तें कर्म टाळल्याने का मन निर्मळ होणार आहे ? कर्म करावयाचें आणि निर्मळ होण्याची उत्तरोत्तर खटपट करावयाची.

एखादा मनुष्य गुहेंत जाऊन बसतो. तेथे कोणाशी संबंधच येत नाही. त्याला वाटतें, आपण आता अगदी शांतमति झालो आहोत. त्याला गुहा सोडून एखाद्या घरीं पुढील जाऊ द्या. तेथें एखादें खेळकर मूल दाराची कडी वाजवतें. तें बालब्रह्म त्या नादब्रह्मात तल्लीन होतें. परंतु त्या निष्पाप मुलाची ती कडी वाजविण्याची क्रिया त्या योग्याला सहन होत नाही. तो म्हणतो, " काय कार्ट्यानें कटकट चालविली आहे ! " गुहेंत राहून त्याने आपले मन इतकें दुबळें केलेले असते कीं इवलाहि धक्का त्याला सहन होत नाही. जराशी कडी वाजली की पुरे, याच्या शांतीची बैठक मोडते, अशी दुबळी स्थिति काही चांगली नाही.

**सहज कर्म म्हणजे अकर्म**

सारांश, आपल्या मनाचे स्वरूप समजून घेण्यासाठीं कर्मांचा फार उपयोग आहे. दोष दिसले म्हणजे ते दूर करता येतील. दोष कळलेच नाहींत तर प्रगति खुटली, विकास खुंटला. कर्म करताना दोष दिसतील. ते दूर करण्यासाठी विकर्मांची योजना करावयाची. अंती असे विकर्मांचे प्रयत्न रात्रंदिवस चालू झाले म्हणजे मग कालांतराने स्वधर्म आचरीत असताच अलिप्त कसें रहावें, कामक्रोधातीत, लोभ-मोहातीत कसें रहावें, ते समजून येईल. कर्म निर्मळ करण्याचा सारखा प्रयत्न होऊ लागला म्हणजे पुढें निर्मळ कर्म सहज होऊ लागेल. निर्विकार कर्म वरच्यावर सहजतेनें होऊ लागले, म्हणजे कर्म केव्हा झालें त्याचा पत्ताहि लागणार नाहीं. कर्म सहज झालें म्हणजे त्याचे अकर्म होतें. सहज कर्मालाच अकर्म म्हणतात हें आपण चौथ्या अध्यायात पाहिले. कर्माचे अकर्म कसे होते तें संताच्या चरणापशी गेल्यास समजेल असेहि भगवंतानी सांगितले. ही जी अकर्मस्थिति ती वर्णावयास वाणी अपुरी आहे.

कर्मांची सहजता समजण्यासाठी आपण परिचयाचा एक दृष्टान्त घेऊं. लहान मूल प्रथम चालावयास शिकते, त्या वेळेस त्याला किती कष्ट पडतात. त्याच्या चालण्याचे आपण कौतुक करतों. बाळ चालायला लागला, असें आपण म्हणतो. परंतु पुढें ते चालणें सहज होते. एकीकडे चालतो व गप्पाहि मारतो. चालण्याकडे लक्षहि नसते. तसेंच खाण्याचे. आपण लहान मुलाचें उष्टावण करतो. जणूं खाणें म्हणजे मोठेंच काम परंतु पुढे खाणें हें सहज कर्म होते. मनुष्य पोहावयास शिकतो तेव्हा किती कष्ट होतात. प्रथम पोहताना दमतो. परंतु पुढें इतर श्रम करून थकला तर म्हणतो, चला जरा पोहावयास जाऊ म्हणजे बरें वाटेल. पुढे ते पोहणें मेहनतीचें वाटत नाही. शरीर सहज तरंगते. श्रमणे हा मनाचा धर्म आहे मन त्या त्या कर्मांत गुंतलेलें असलें तर

श्रम होतो. परंतु कर्में सहज होऊ लागली म्हणजे बोजा वाटत नाहीं. कर्म जणू अकर्म होतें. कर्म आनंदमय होतें.

कर्माचें अकर्म होणें हे आपलें ध्येय आहे. या ध्येयासाठीं स्वधर्माचरणरूप कर्में करावयाचीं. तीं करीत असताना दोष दिसतील ते दूर करावयास विकर्माची कास धरावयाची. आणि असा अभ्यास करीत गेले म्हणजे मनाची अशी एक ठेवण होते कीं, कर्मांचा यत्किंचित्‌हि त्रास होत नाही. कर्में हजारों हातून होत असताहि मन निर्मळ शात राहत. तुम्ही आकाशाला विचारा, "बा आकाशा, तू उन्हानें करपून जात असशील, पावसात ओलेंचिंब होत असशील, थंडीत कुडकुडत असशील!" आकाश काय म्हणेल? तें म्हणेल, "मला काय काय होते तें तुमचे तुम्ही ठरवा. मला काहीं माहीत नाहीं."

**"पिसे नेसलें कीं नागवें लोकी येऊन जाणावें।"**

वेडा मनुष्य नागवा आहे कीं नेसलेला आहे तें लोकानीं ठरवावें. वेड्याला त्याचें भान नाहीं.

### कर्मयोगाची किल्ली

भावार्थ एवढाच की, स्वधर्मांचरणाची कर्में विकर्मांच्या साहाय्यानें निर्विकार करण्याची सवय होता होता तीं स्वाभाविक होतात. मोठमोठे प्रसगहि मग कठीण वाटत नाहींत. कर्मयोगाची अशी ही किल्ली आहे. किल्ली नसली तर कुलूप फोडतां फोडता हाताला फोड येतील. परतु किल्ली सापडली कीं क्षणात मोकळा कारभार! कर्मयोगाच्या या किल्लीमुळें सर्व कर्में निरुपद्रवी वाटतात. ही किल्ली मनोजयानें मिळते. मनोजयाचा अविरत प्रयत्न हवा. कर्में करताना जे मनोमळ दिसतील ते धुऊन टाकण्याचा प्रयत्न हवा. म्हणजे मग बाह्य कर्मांची कटकट वाटत नाही. कर्मांचा अहंकारच नाहींसा होतो. कामक्रोधाचे वेग नष्ट होतात. क्लेशाची जाणीव नाहीशी होतें. कर्मांचीहि जाणीव उरत नाहीं.

एकदां मला एका भल्या मनुष्यानें पत्र लिहिले, "अमुक इतका रामनामाचा जप करावयाचा आहे. तुम्हीहि यात भाग घ्या व रोज किती करणार तें कळवा." तो मनुष्य आपल्या बुद्धीप्रमाणें खटपट करीत होता. मी त्याचा दोष म्हणून सागत नाही. परंतु रामनाम ही मोजावयाची वस्तु नाहीं. आई मुलाची सेवा करते. ती का तिचा रिपोर्ट प्रसिद्ध करते? रिपोर्ट प्रसिद्ध करील तर 'थॅंक यू' म्हणून तिच्या ऋणांतून मुक्त होता येईल. परंतु आई रिपोर्ट देत नाही ती म्हणते, "मी काय केलें, मी कांहीं केलें नाहीं. तें का मला ओझें आहे?" विकर्मांच्या साहाय्यानें मन लावून हृदय ओतून

जेव्हां मनुष्य करतो, तेव्हां ते कर्मच राहत नाही. ते अकर्म होतें. तेथें क्लेश, कष्ट, वांकडेतिकडे, काही नाहीं.

## सूर्याला उगवण्याचें भान नसतें

ही जी स्थिति तिचें वर्णन करता येणार नाहीं. या स्थितीची अंधुक कल्पना आणून देता येईल. सूर्य उगवतो, परंतु मी आता अंधार दूर करीन, पांखरांना उडायला लावीन, लोकांना कर्में करावयास प्रवृत्त करीन, असें त्याच्या का मनांत असते? तो उगवतो, तेथें उभा राहतो. त्याचें तें अस्तित्व विश्वाला चालना देतें. परंतु सूर्याला त्याचें भान नाहीं. तुम्ही जर सूर्यास म्हणाल, "बा सूर्या, तुझे अनंत उपकार, तूं किती अंधार दूर केलास." तर तो सूर्य बुचकळ्यात पडेल. तो म्हणेल, "चिमूटभर अंधार मला आणून दाखवा. मग तो जर मला दूर करता आला तर मी म्हणेन कीं हें माझें कर्तृत्व!" अंधार सूर्याकडे घेऊन जाता येईल का? सूर्याच्या अस्तित्वानें अंधार दूर होत असेल, त्याच्या प्रकाशात कोणी सद्ग्रंथ वाचीत असतील तर कोणी असद्ग्रंथहि वाचीत असतील, कोणी आगी लावतील तर कोणी परोपकार करतील. परंतु या पापपुण्याचा जबाबदार सूर्य नाहीं. सूर्य म्हणतो, "प्रकाश हा माझा सहजधर्म आहे. माझ्याजवळ प्रकाश नसेल तर काय असेल? मी प्रकाश देतो हे मला माहीत नाहीं. मी असणें म्हणजेच प्रकाश. प्रकाश देण्याच्या क्रियेचे कष्ट मला नाहींत. मी काही करीत आहे असे मला वाटत नाही."

सूर्याचें जसें हें प्रकाशदान स्वाभाविक आहे असेंच संतांचें असतें. त्याचें जगणें म्हणजेच मुळी प्रकाश देणें. तुम्ही ज्ञानी पुरुषाला जर म्हणालां, "तुम्ही महात्मे सत्यवादी आहात!" तर तो म्हणेल, "मी सत्यानें चालणार नाहीं तर दुसरें करूं तरी काय? मी विशेष काय करतो?" ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी असत्यता संभवतच नाही.

## परमधन्य अकर्मदशा

अकर्माची ही अशी भूमिका आहे. साधनें इतकी नैसर्गिक व स्वाभाविक होतात कीं तीं झाली आणि गेलीं हें समजतहि नाही. इंद्रियांना तें सहज वळणच पडतें. "**सहज बोलणें हितउपदेश**" असें होतें. अशी जेव्हां स्थिति प्राप्त होते तेव्हा कर्म हें अकर्म होतें. ज्ञानी पुरुषाला सत्कर्में सहज होतात. किलबिल करणे हा पांखराचा सहज धर्म आहे. आईची आठवण होणें हा मुलाचा सहज धर्म आहे. त्याप्रमाणें ईश्वराचें स्मरण होणें हा संतांचा सहज-धर्म होतो. पहाटे कुकूऽऽकू करणें कोंबड्याचा सहज-धर्म आहे. स्वर समजावून देतांना भगवान् पाणिनीनें कोंबड्याच्या आरवण्याचें उदाहरण दिलें आहे. पाणिनीच्या वेळेपासून आजपर्यंत कोंबडा पहाटे